





म. ग्रं. सं. ठाणें
विषय १०२४
सं. क्र. 2392

शाळां व डी. एड्. कॉलेजमधील शिक्षकांना
अत्यंत उपयुक्त ठरलेले



कृतियुक्त गीतांचे पुस्तक —

# अभिनय गीतें

( ॲक्शन साँग्ज् )


व


# विज्ञान गीतें


गीतरचना : --

…न उद्धव हरलेकर
…, डी. एड् कॉलेज, कोल्हापूर.
शुगरमिल्स प्रा० स्कूल, कोल्हापूर

REFBK-0021888







गुरु-प्रसाद प्रकाशन, कोल्हापूर. [कि

वि. क्र. २२१६

29ccc
20/10/66
(१)३१०४

# कृतियुक्त--अभिनय गीताच्या पाठाचे टाचण — नमूना

| विषय | पद्धत |
| --- | --- |
| प्रास्ताविक उत्तेजक हालचाली<br>७ ते ८ मि.<br>अ) पळणें काळ्यामाळ्या, ससा-ण्या उड्या, बेडूक उडया, मोटर, सायकल ब) तळयात-मळयात हा छोटा खेळ क) सोपे सर्वांग सुंदर व्यायाम २ प्रकार. | मुलांना गोलाकार उभा करून शिक्षक उत्साहाने सदर कृती करून दाखवून मुलां-चे करून करून घेतील. प्राण्यांच्या हालचा-लींच्या पोझिशन्स चांगल्या होतील इकडे लक्ष देऊन स्वत: मोकळेपणाने दाखवतील शिक्षक करतील त्याप्रमाणें मुले व्यायाम करतील. |
| विषयाचा भाग १२ मि.<br>सौंगड्यानो या' हे गीत<br>येथे गाणें संपूर्ण लिहावे.<br>गीतातील प्रमुख कृती– १) ताला-वर नाचणें, २) चेंडू फेकणें-झेलणे ३) झाडावर चढणें, झोके घेणे ४) जाळे फेकणे ५) नाव वल्हवणें ६) पोहण्याची कृती | प्रथम शिक्षक मुलाना गाण्याची चाल १–२ ओळी म्हणून दाखवतील मुलांकडून म्हणून घेतील. नंतर एक-एक ओळ म्हणत अभिनय कृती करून दाखवतील. मुलांचे कडून गाणे म्हणत ती ओळ करून घेतील. कृती अवघड असल्यास गाण्यातील ओळी ३–४ वेळा सांगन करून घेतील. चांगला<br>II मुलांचा उपयोग करुन |
| रंजनात्मक भाग– ८<br>सदर गीत पुन्हा घेणे.<br>किंवा<br>खेळ घेणे,<br>खेळाचे नांव व वर्णन लिहावे. | स्वत: सांगतील. गीत<br>मुले अभिनय करतील.<br>वेळ चुका दुरुस्त कराव्यात. खेळ घेत-ल्यास खेळ कसा घेणार ते वर्णन लिहावे. |
| कवायत विराम २ मि.<br>शिक्षक– पिपाणी वाजे ।<br>विद्यार्थी– पि पी पी<br>शिक्षक– ताशा वाजे ।<br>विद्यार्थी– तड तड तड<br>शिक्षक– झांज वाजे ।<br>विद्यार्थी– झन् झन् झन्<br>शिक्षक– ढोल वाजे ।<br>विद्यार्थी– ढम | सोबत दर्शविल्या प्रमाणें शिक्षक मुलांना सवाल करतील.<br>मुले वाद्यांचे आवाज काढून गमतीने उत्तर देतील.<br>"ढम्" म्हणताच उंच उडी घेतील.<br>व वर्गाकडे ओळीने जातील. |

REFBK 0021888
REFBK-0021888

## कृतियुक्त गोष्टीरुप खेळाच्या पाठाचे टांचण — नमुना

| विषय | पद्धत |
| --- | --- |
| १) प्रास्ताविक : उत्तेजक हालचाली अभिनय-गीताच्या पाठाप्रमाणें | अभिनय-गीताच्या पाठाप्रमाणें |
| २) शिकविण्याचा भाग : १२ मि.<br>एक म्हातारी लेकीच्या गावाला निघाली वाटेत अनु लांडगा, अस्वल, वाघ. सिह भेटतात. म्हातारीला 'म्हातारे म्हातारे मी तुला खातो' म्हणतात म्हातारी म्हणते. लेकीच्या घरी जाते तूप रोटी खातें लठ्ठ होते मग मला खा। ती लेकीच्या घरी जाऊन तूप रोटी खाते लठ्ठ होते भोपळ्यात बसून परत येते. वाघ सिह विचारता। "भोपळ्या म्हातारी कुठ आहे" ?<br>म्हातारी नाही कोतागी नाही, चल रे भोपळ्या टुणुक् टुणुक। असे उलट उत्तर देत म्हातारी पळू लागते. सर्वजण भोपळा पकडतात म्हातारीच्या जवळ यतात. म्हातारीने आणलेली तिखट पूड म्हातारी त्यांच्या डोळयात फुंकते. ते एकमेकाशी भांडतात. म्हातारी पळून जातें.<br>प्रमुख कृती<br>१) म्हातारीची चाल, लांडगा, अस्वल, वाघ सिह यांच्या हालचाली सुरावर, तालात विचारणें व उत्तर देणें.<br>२) टुणुक् टुणुक उडया मारीत चालणें. | सदरप्रमाणे शिक्षक प्रथम थोडक्यात गोष्ट सांगतील। नंतर मुलांना गोलावर उभे राहण्यास सांगून ते स्वत: न लाजता गोष्ट सांगत कृती करून दाखवतील व त्या प्रमाणें मुलांचेकडून करून घेतील. प्रमुख कृती २/३ वेळा चागल्या रीतीने करून घेतील. याप्रमाणें संपूर्ण गोष्ट साभिनय व कृतीसह करून घेतील।<br>(काहीं मुले उत्तर अभिनय व कृती करतात। त्यांचा उपयोग करून घ्यावा. लाजाळू मुलांचेकडून गोड बोलून त्यांच्या कलाने हावभाव करून घ्यावेत.) |
| ३) रंजनात्मक भाग: ८ मि.<br>शिक्षकानी गोष्ट सागावी मुलांनी ती कृती हावभाव करून पुन्हा करावी, | शिक्षकांनी आवाजाचे जोरावर गोष्ट प्रभावी रीतीने सांगत मुलांचेकडून अभिनयासह कृती करून घ्यावी। |
| ४) कवायत विराम : २/३ मि.<br>अभिनय-गीताच्या पाठाप्रमाणें | अभिनय-गीताच्या पाठाप्रमाणें |



आमच्या घरातला 'बडा पैलवान'

## चि. विवेक

## उर्फ

## चि. नंदू यास —

## दादांचेकडून ....

# बडा पैलवान

कित्ती कित्ती छान । गोरा गोरा पान ।
आरशात दिसतो मी बडा पैलवान ।। धृ० ।।
पिळदार दंड माझे । लोखंडी काब ।
तुम्हांस बेडकी दाखवूं का छान् ।। १ ।।
मोठ्या मोठ्या मांड्या माझ्या । हत्तीचे पाय ।
शड्डू तुम्हां मारून । दाखवूं काय ? ।। २ ।।
भरदार छाति माझी । दिसे ऐटदार ।
भीमापरी बैठऽक मारीन जोरदार ।। ३ ।।

# राणीचा बाग

ग-ग-गजू । म-म-मधू । राणीचा बाग आला मला बघू ।।धृ।।



म-म-मोर । पक्षी राजा थोर ।
फुलवून पिसारा । नाचे मन चोर ।१।
बदक ब-ब । करुन क्व क्व ।
टांवर होडी चाले । डुलू डुलू ।२।
जिराफ ज-ज । होऊन उंच ।
उंटावर ताणकरी । चाळ झराझर ।३।



शहामृग श-श
नका करूं हुश् ।
लांब टांगा टाकूं
धऊ भुरं भुरं ।४।



ऑस्ट्रेलियन आ
कांगारू का ।
शेपटाच्या खुर्चीवर
साहेब हा ।५।

---

ग-ग-गजू ही ओळ म्हणत तालात गोलावर नाचावें. ' राणीचा बाग आला ' येथून तालावर टाळया वाजवाव्यांत. त्याच तालांत खालील कडवी म्हणावी व सोबत दर्शविलेल्या पोझिशन्स घेऊन कृती कराव्यात

मोर :– लंगडीप्रमाणें एका पायावर तालांत डोलावें. दुसरा पाय मागें लांब करावा. थोडें पुढें झुकावें. दोन्ही बाजूनी हात डोक्यावर पिसाऱ्याप्रमाणें धरुन डोलावें.

बदक :– एक पाय पुढें–दुसरा किंचीत मागें घेऊन चवडयावर बसावें. दोन्ही हातांचे पंजे जुळवून बदकाच्या चोचीप्रमाणे धरुन तालांत चालावें.

जिराफ :– दोन्ही हात डोक्यावर ताठ ऊंच करुन बोटांत बोटे मिळवावीत. गुडघे ताठ करुन टाचा उचलून किंचीत पुढें झुकून तालांत चालावें.

शहामृग :– चवडयांवर तालात पळावें. पुढे झुकावें. दोन्ही हात बाजूस ताठ करुन पंखाप्रमाणें मागें पुढे हालवावेत.

कांगारू :– खुर्चीवर बसल्याप्रमाणें बसावें. हातांचे पंजे छातीजवळ, पण पुढें दाखवावेत व दोन्ही पायावर तालांत उडया माराव्यात.

# आजोबा



आले आजोबा ओटीत । काठी, टेकित टेकित ।
दौडा दौडा, आधी दौडा । गोष्टी ऐकूं रंगात
॥ ध्रु ॥

शड्डू, मारुन तयार व्हा । 'बलभीम' आपण होऊंया ।
मारुं बकासुर ठोशांत । रंगू आपण गोष्टींत । ॥ १ ॥

घेऊं पवित्रा, मारुतिचा । सेतु बांधण्या लंकेचा ।
दगड फेकुया दर्यात । रंगू आपण गोष्टींत ॥ २ ॥

भाला, घेऊन तयार व्हा । प्रताप राणा जय बोला ।
शत्रू मारुया फेकींत । रंगू आपण गोष्टींत ॥ ३ ॥

यशवंती जा गडावर, । चढा मावळे दोरीवर ।
'तान्ह्या' लढूं दे जोशांत । रंगूं आपण गोष्टीत ॥४॥

अश्व दौडूं दे, राणीचा । झाशीच्या त्या लक्ष्मीचा ।
बिजलीपरी जा वेगांत । रंगूं आपण गोष्टीत ॥ ५ ॥

---

१) आजोबा – वाकून उजव्या हातांत काठी – डावा हात पाठीवर धरून तालांत चालणें, २) दौडणें – तालांत टाळ्या वाजवीत पळणे, ३) भीम-पवित्र्यांत शड्डू मारणें- डावा पाय पुढें टाकून पवित्रा घेणें- मागील पाय ताठ, डावा हात बकासुराच्या गळ्यावर दाबल्या प्रमाणें रेटून उजव्या हातानें तालांत गुद्दे मारणें, ४) मारुतीप्रमाणें उजवा पाय उजव्या बाजूस पवित्र्यात घेणें डाव्या हातावर पर्वत. उजव्या हातांत गदा. गाल फुगवून फुगवणें. तालांत दगड उचलणें व समुद्रात फेकणें हा अभिनय. ५) भाला घेणें व उजवा पाय मागे घेऊन भाला फेकीची पोझिशन घेणें व शत्रूस भाला मारणें, ६) दोन्ही हाताची बोटें एकमेकात गुंतवून बसून, हात नागमोडी वळवीत घोरपड गडा-चढल्याचा अभिनय करणें व डावा पाय पवित्र्यात पुढे टाकून ढाल तलवार लढाईचा अभिनय. ७) घोडदौड– प्रथम दुडकी चाल, नंतर दुप्पट वेग. डाव्या हाताउ लगाम, उजव्या हाताने मांडीवर आवाज काढणे

# जंगल मंगल

( चाल :– छडी लागे छम् छम् )

चला वनामधी[1] जाऊंया । गंमत जंमत पाहूंया ।
या या या । सारे लौकर या या ॥ धृ ॥
गवतांमध्ये ससा[2] पहा हा । उभे दोन्हीं कान ।
घाबरुन हा उडया मारतो पहा टाण् टाण् । टाण् टाण्[3] टाण् ॥ १ ॥
काळविटाचे पाय[4] पहा हे । लोखंडाचीं कांब
दौड[5] याचीं जोराचीं उडया लांब लांब । लांब लांब लांब ॥ २ ॥
टेकाडा[6] परी हत्ती भाऊ लोंबे सोंड छान ।
चाल याचीं जोराची झगाझपा झाम् । झाम् झाम् झाम् ॥ ३ ॥
झाडावरती कोण पहा हे वानर वानर हुप्[7]
वेडावते पहा लावूं शेंडीला तुप् ।
हुप्[8] हुप् हुप् । तुझ्या शेंडीला तुप् ॥ ४ ॥
जाळींमध्यें आलाल् डुर्रर्रे । काळा भोर वाण ।
दोन[9] पायांवर चाल तुमची अस्वल भाऊ छान् । छान् छान् छान् ॥५॥

---

१) मागील दोन गीतांप्रमाणेंज तालावर नाचत जाणें, २) चवडयावर बसून सशाच्या कानाप्रमाणें हात डोक्यावर घेणें. ३) त्याच स्थितीत नर्गुळांव टाण टाण या शद्वांबरोबर ३ उडया आंत मारणें पुढील ३ उडयांत पूर्वस्थळीं यंणें. ४) उडीच्या तालांत पाय ताठ करून पायावर थाप मारणें ५) हात लांब व ढेंगा लांब लांब टाकणें ६) उंच हात करून वाकून डाव्या हातानें नाक धरणें उजवा हात सोंडेप्रमाणें हालवीत पाय आपटत चालणें (७ व ८) वानराप्रमाणें बसणें व वेडावून उडया मारणें ९) गुडघ्यांत वाकून ताठ राहाणें. हात कोपरात मुदडून खांद्याजवळ लुळे धरुन मान वाकडी करणें व चेहरा रडवा करुन अस्वलाप्रमाणें चालणें.





# सौंगड्यांनो या ऽऽ

सौंगड्यानो[1] या ( मैत्रिणींनो या ) सुट्टी झाली या ।
नदीकांठीं खेळण्याला । दौडत दौडत या ।।धृ.।।

चेंडू हातीं घ्या[2] । उंच जाऊं[3] आ । हुऽऽय्या[4]
आला आला खालीं आला, आपण[5] झेलूंया ।।१।।

झाडावरीं[6] या । वाहतो वारा ।
फांदवरीं[7] बसुनिया झोके घेऊं या ।।२।।

जाळे हाती घ्या[8] । कोळी होऊं या ।
मासे धरण्या जाळें आतां आपण फेकूंया । हुऽऽय्या[9] ।।३।।

नावेमध्यें या । वल्हीं[10] । हातीं घ्या ।
वल्हवीत[11] नाव आपण दूर जाऊंया ।।४।।

तैयार व्हा । आतां पोहाया ।
शड्डू[12] ठोकुनी पाण्यामध्यें उडी टाकूंया ।।५।।

बजरंग बली की जय[13] ।

---

१) तालांत गोलावर नाचत मित्रांना हांक मारणें. २) उजव्या हातांत चेंडू घेऊन उजवा पाय पाठीमागें घेणें, चेंडू उंच फेकण्याचा पवित्रा. ३) त्याच स्थितीत डाव्या हातानें आकाशाकडे बोट दाखविणें. ४) 'हुय्या' शब्द तोंडाने करून चेंडू उंच फेकणें, उजवा पाय पुढें टाकून वाकविणें. ५) 'आपण' यावेळी चेंडू पकडल्याचा अभिनय करीत टाळी वाजविणें. ६) झाडावर चढल्याचा अभिनय, ७) फांदीवर बसून झोके घेणे, ८) पवित्रा व जाळे दोन्ही हातांत, ९) 'हुय्या' वेळीं जाळे फेकणें. पुढे फक्त वाकणें, १०) वल्ही हातांत धरुन वाकून उभे राहाणें. ११) १ ला वाकणें, २ ला उठणें या पद्धतीनें वल्ही मारीत चालणें. १२) डावा हात छातीवर घेऊन उजव्या हातानें दंड थोपटणें. १३) 'उडी मारून' पुढचे वाकवून पाहिल्याप्रमाणें हात मारत पुढें जाणे.

# फेरीवाला

आला[१] फेरीवाला आला । आला हो आला ।
या मुलांनो । या मुलींनो । चित्रें घेऊनी खेळा हो खेळा ।।धृ०।।

सायकल[२] घ्याही दोन आण्याची । कुर्रर्र । घंटा वाजे साची ।
हँडल धरुनी[३] । पाय मारुनी । लाऊंया वेगाला ।। १ ।।

ढवळ्या पवळ्या जोडा आतां । तीन आण्याला गाडी घेतां? ।
बैल गाडीवर[४] बसून ऐटींत । जाऊंया शेताला ।। २ ।।

ऐट बघा ही ह्या घोड्याची । टप्‌टप्[५] ऐका चाल त्याची ।
चार आण्याला । टांगा घ्या हा । चाबुक[६] द्या घोड्याला ।। ३ ।।

फोर्ड बघा ही किल्ली देऊन । भुर्रर्र धावे[७] हरिणी वाणी ।
आठ आणे येथें टाकुनी । घेऊन जा फिरण्याला ।। ४ ।।

झुकूझुकू[८] डबे जोडा । आली धांवत वाट सोडा ।
सिग्नल पडला । शिटी वाजली । लागली[९] जोराला ।। ५ ।।

गरुड भरारी[१०] तुच्छ जाहली । वाऱ्यावरती स्वारी झाली ।
आकाशामधीं । विहार[११] करण्या । विमान घ्यां खेळाला ।। ६ ।।

---

१) गाडी ढकलणाऱ्या फेरीवाल्याप्रमाणे हात पुढे करून तालात पावले टाकणे, २) सायकल धरल्याप्रमाणे हात करून घंटा वाजवावी, ३) सायकलवर टांग टाकून बसल्याप्रमाणे करून पाय मारावेत ४) हातात चाबूक घेऊन गाडी हांकणें, ४) घोड्याप्रमाणें दौडावे, मांडीवर टापांचा ताल हाताने धरावा, ६) त्याच वेगानें चाबूक हवेत फिरवीत दौड मारावी, ७) ड्रायव्हरने चाक हातीं धरल्याप्रमाणें बसून पाय जास्त उंच न उचलता वेगाने पळावे, (पंप्, भर्रर्र् आवाज काढावा), ८/९) एक पाठीमागे एक धरून आगगाडीप्रमाणें शिटी वाजवून चालावे, १०/११) विमानाप्रमाणें बसून हळूहळू उठत पळावे.

# == सर्कस ==

( चाल : अगड बंबंबं )

तड तड ढम् ढम् ढम्,[1] । ढोल वाजला ढम् ।
सर्कशीचा बँड वाजे तडतड तडाड ढम् । ढम् ढम् ढम् ॥धृ०॥

सायकलरवती[2] काम करूंया हात सोडोनी ।
एका मागुनि एक जाऊं एका ओळींनीं ।
पाय मारुनी नाही भरला अजून आपणा दम् । सर्कशीचा ॥१॥

झुलत झुलत[3] हे हत्ती आले हालवीत सोंडा ।
झप् झप् चालुन दुसऱ्यावरती करती ते खंडा ।
खाली बसुनि सोंड हालविती वेगे सन् सन् । सर्कशीचा ॥२॥

घोडे दौडत[4] रिंगणामध्ये टपाटपा आले ।
कडकड चाबुक हातामध्ये वेगाने चाले ।
टप् टप् घोडे दौडतांतीं चाबुक छम् छम् । सर्कशीचा ॥३॥

पहा पहा हा । विदुषक आला फिरवित हा सोटा ।
ऐटीत चाल पाहुनी त्याची हसण्या नच तोटा ।
उड्या मारतो कसा पहा तो करीत टण् टण् । सर्कशीचा ॥४॥

वेगाने मग झोके घेती झोपाळ्यावरती ।
तारेवरची कसरत सारी नीट निरखूं तीं ।
खेळ संपला घरी जाऊया घंटा वाजे घण् । सर्कशीचा ॥५॥

---

१) ढोल वाजल्याप्रमाणें मांडीवर ताल धरीत तालात एकेका पायावर उड्या मारीत जाणें. २) हात बाजूस करून पायाच्या चंप्यावर पॅडल् मारल्याप्रमाणें उड्या माराव्यात, ३) डाव्या हाताने नाक धरून उजवा हात सोंडेप्रमाणें हालवीत वाकून चालणें, पायाचा ताल जोराचा असावा, ४) घोड्याप्रमाणे दौडणें, ५) वेडे-वाकडे पण तालात उड्या मारीत चालणें, ६) हाताने झोके घेतल्याचे दाखविणें, तारेवरून चालल्याचा अभिनय करावा.

# काय आवडे अधिक तुम्हां ?

आई – खेळणीं सुंदर बघा मुलांनो । काय आवडे अधिक तुम्हां ।
( वडील ) सांगा लवकर तुम्ही मला ॥ ध्रु० ॥

नंदू – ससा टुण् टुण् उड्या मारतो । आणि आपणा भिऊन पळतो ।
तोच आवडे अधिक मला । द्या ससा मज खेळाया ॥१॥

दीपा – रुळावरती तीं फिरते झुक्झुक् । शीट वाजते मधुन कुकू ।
तीच आवडे अधिक मला । आगगाडी द्या खेळाया ॥२॥

राजेंद्र पंप आवडे दाबा (आई) मजला । जाण्या मामाच्या गांवाला ।
भर्रकन् पळते तीच द्या मला । द्या मज मोटर खेळाया ॥३॥

जयंती– गाल टपोरे फुगवून बसते । आणि निजविता डोळे मिटते ।
बाहुली आवडे अधिक मला । द्या बाहुली मज खेळाया ॥४॥

सीमा–किल्ली देता गरगर फिरते । झांझ हातांतील ते वाजविते ।
अस्वल आवडे अधिक मला । द्या अस्वल मज खेळाया ॥५॥

सुमंत-बसले माकड सायकलवरती । फिरते सायकल गरगर बघती ।
माकड आवडे अधिक मला । द्या माकड मज खेळाया ॥६॥

---

**किशोर आणि कंपनी,**
आर्ट मटेरियल व
कागदाचे व्यापारी,

**मेहता आणि कंपनी,**
वह्या व स्टेशनरी मालाचे
प्रमुख व्यापारी.

महाद्वार रोड, कोल्हापूर.

# दर्याचं राजं

फेसाळल्या दर्यात होडी लुटुं यारं । दर्याचं राजं आतां हुशियार व्हारं ।।

भरभर भर वायु आतां कृष्णापरी आला ।
घुंई घुंई घुंई वाजवितो वदनी मधुर पावा ।
गुंग होती लहरी जणुं गोपी धुंद प्यार ।।१।। दर्याचं राजं ।।

सागराच्या मांडीवरीं होडी बाळ डोलती ।
सूर्यबिंब जळामधी साथ हेलावती ।
किरण वृंद रवि भंवती धरती नृत्य फेर ।।२।। दर्याचं राजं ।।

होडी जाय हंसीपरी मानसी सरोवरी ।
चाल तिची डौलदार मंदगती भारी ।
जोष भरुन दर्यामधीं होडी वल्हवारं ।।३।। दर्याचं राजं ।।

होडी रुपी सिंहासनी बसुनी राजापरी ।
ढाळितसे वायुदास चवरीं डोक्यावरी ।
घेऊं मुजरा रयतेचा लहरी रयत प्यार ।।४।। दर्याचं राजं ।।

---

## — काही प्रास्ताविक हालचाली —

१) प्राण्यांच्या हालचाली – बेडूक, ससा यांच्या उड्या, लंगडा कुत्रा, उंट, जिराफ, अस्वल, हत्ती, घोडा, वानर, कांगारू, सुरवंट यांच्या हालचाली.

२) धंदेवाल्यांच्या हालचाली – सुतार, परीट, लाकुड-तोड्या, ड्रायव्हर, सायकलीत हवा भरणारा, शिपाई, शिकारी, मोट हाकणारा, फेरीवाला, खणणारा, जाळे फेकणारा कोळी इ०

३) इतर हालचाली – काळ्यामाळ्या, जागेवर उड्या, भूगी, राक्षस, च्याऊ म्याऊ, खेचाखेची, चवड्यावर चालणें, टाचेवर चालणें, दिडकी दौड, च-ढ्यावर उड्या, लंगडी, उडती पाखरे, पाठीमागे न पाहता चालणें.

---

आपण पुढील आयुष्याची तरतूद केली आहे काय?
आपला स्वत:चा विमा ही सर्वांत चांगली व फायदेशीर तरतूद आहे.
अधिक माहितीसाठी भेटा —
विमा–प्रतिनिधी,
हे र ले क र बं धू,
सं. म. हौ. सो. प्लॉट नं ४५, राजारामपुरी पूर्व, कोल्हापूर.

# गारांचा पाऊस

( चाल- शुकीर चांद आला )

टप् टप् पडती गारा । सरसर पाऊस आला ।
आनंदानें नाचत यारे । अंगणी खेळाया । या रे लौकर या ॥

तडातडा । पडे सडा । –चौकामध्यें टाकू उडचा ।
गारा वेचुनी टाका तोंडी । गारेगारऽऽवाला ॥१॥ यारे लौकर

येरे येरे । पावसा ये । – देतो तुजला । पैसा घे ।
पैसा झाला खोटा आमचा । पाऊस आला मोठा ॥२॥ यारे..

गरा गरा फिरुं चला । काळ्या माळ्या घालूं चला ।
चिंब भिजूया । पांखरापरी । झेलूं पंखी गारा ॥३॥ यारे..

इकडे तिकडे । बघा जरा । पाट वाहती खळाखळा ।
होडी कागदी वल्हवुन जाऊ । मामाच्या गावाला ॥४॥ यारे..


वाकत वाकत । तरा तरा । आजी आली बघा जरा ।
पळून जाऊं । लपुन बसूंया । अंधाऱ्या कणगीला ॥५॥ यारे..

---

"चांगल्या ग्रंथ वाचनापासून झालेली तरूण पिढी हीच खरी राष्ट्राची संपत्ती आहे. या तरूण पिढीवर उत्तमोत्तम संस्कार हे ग्रंथच करू शकतील. अनेकांच्या घरी उत्कृष्ट फर्निचर असू शकते; पण चांगले ग्रंथ दिसत नाहीत. मराठी माणसाच्या घरी निदान शंभर अभिजात ग्रंथ संग्रही असले पाहिजेत. मराठीत विपुल व चांगली ग्रंथ-निर्मिती होत असूनहि अनेक ग्रंथ सर्वसामान्य वाचकापर्यंत कधीच पोचत नाहीत संस्कृतीचें खरे संवर्धन व्हायचे असेल, तर चांगल्या साहित्याविषयीचे प्रेम लोकांत वाढले पाहिजे."

वि. स. खांडेकर

गुलमोहर बुक डेपो, खरी कॉर्नर, कोल्हापूर.



## चाल गड्या चाल रं ऽ

चाल गड्या चाल रं । चाल म्होरं चालरं ।
शेताकडं बिगी बिगी बिगी बिगी चालरं ।
बिगी बिगी चालरं । बिगी बिगी चालरं ।
बिगी बिगी चालरं ।।ध्रु।।

सांचं फुटलं रं आरवलं कोंबडं । आरवलं कोंबडं ।
ढवळ्या पवळ्या चलारं मोत्या तूं हो पुढं ।
नगं नगं उशीर बिगी बिगी चालरं ।।१।।

तुडुंब भरलीया पाण्यानं हीर । पाण्यानं हीर ।।
मोट धरंयारं जोडून कासरं ।
कुईकुई चाक वाजे ढवळ्या पवळ्या चालरं ।।२।।

मोत्यांच्या कणसानं भरलं शिवार । भरलं शिवार ।
गार गार वाऱ्यानं रान डोलं सारं ।
माळ्यावरी गोफणीनं । उडवूंया पांखरं ।।३।।

करंयारं कापणी दाणं तयार । दाणं तयार ।
गोंद्या, म्हाद्या, व्हा पुढं बांधूयारं भारं ।
खळ्यावरी नेऊनिया । सोडूंया सारं ।।४।।

खळ्यांवरीं बैलांची पात तूं हाक रं । पात तूं हाक रं ।
धान्यं भरंया रं देऊनिया वारं ।
पोती भरूं धान्याची । गाडी घरी हांक रं ।।५।।

---

अधोरेखीत ओळी ३ । ३ वेळां म्हणाव्यात. सर्व गीतांतील पोझीशन्स मलरी दादाप्रमाणेंच आहेत. तथापि, निरनिराळ्या प्रकारे हें गीत घेता येते. 'मलरी दादा', 'धरती माता' 'चालगड्या' या गीतावर बसविलेली नृत्यें प्राकंडप्रमाणें स्टेजवरहि फार गाजलेली आहेत. शिक्षक बंधूंनी तसा प्रयत्न करावा.

# सुगीचं गीत

यारं जल्दी चला म्होरं । यारं जल्दी चला म्होरं ।
बिगी बिगी म्होरं ।
सुगी आली आतां । हासूं नाचूं गाऊं सगळं ॥
हासूं नाचूं गाऊं सगळं ॥धृ॥ बिगी . .

चांद गोल आला गगनीं । बहर आज पुनवेची ।
वारा झुळझुळ थंड व्हातुया । धरती खुलली नवतीची ।
धुंद होऊं आतां । फडफड डफ वाजूंद्यार ॥१॥

रानामंदी कणसं डोलती । नटली रानं मोत्यानं ।
वाऱ्यासंगं डुलुनि खुणविती । या या म्हणती प्रेमानं ।
साथ देऊं त्यांना तयावर जगती सान थोर ॥२॥

ढोल घुमूंद्या मध्यें ढुप्ढुप् । आपण सारे गोल करूं ।
आले आजोबा पोरासंगे । काठी टेकीत फेर धरूं ।
कसा रंगला रं । आपला खेळ मजेदार ॥३॥

लेझीम हाती गुंग होऊया । तालावरती कदम धरूं ।
कडकड हलगी, घुम् घुम् घुमकं । साथीवरती जोर करूं ।
जोश येऊंद्यारं । भरूंद्या अंगी मस्ती वारं ॥४॥

---

— काही कवायत विराम —

१) ३ व ५ टाळयांच्या चिटक्यांचा इ. २) हुप् हुप् हुप् म्यांव म्यांव याप्रमाणें प्राण्यांच्या आवाजाचे. ३) भारत भारत जय हें । याप्रकारच्या घोषणांचे.

शिक्षक– ढगांचा ? विद्यार्थी–गडगडाट, । शि.– पिपाणी वाजे ? वि.– पि पि पि
,, – विजांचा ? ,, – कडकडाट, । ,, – झांज वाजे ? वि.– झन् झन् झन्
,, – पावसाचा ? ,, – सरसराट, । ,, – ताशा वाजे ? ,, – तडाड् तड्
,, – मुलांचा ? ,, – थय थयाट, । ,, – ढोल वाजे ? ,, – ढम्

# चल ढवळ्या-पवळ्या

चल ढवळ्या । चल पवळ्या । बिगी बिगी बिगी जाऊया ।
लई मोलाचं शेत आपुलं । धान्यानं फुलवूंया । चल ढवळ्या ।।धृ।।

फुटलं तांबडं पूर्वेला हळूहळूं ।
बांग देत कोंबडा आता कुकुचकूं ।
चल जलदीनं बिगी जाऊया । आपुल्या रं शेताला ।।१।।

शेत नांगरूं जल्दीनं । चला हाका ।
फोडूं ढेकळं कुदळीनं । बसूं नका ।
मृगधारा या सरसर आल्या । शेताला भिजवाया ।।२।।

विहीर भरलीं पाण्यानं । खरोखरी ।
मोट चालूं द्या तीवरती । कुंईकुंई ।
पाट फोडुनी पाणी झडकरी । शेताला पाजूंया ।।३।।

करूं पेरणी घातीला । चटाचटा ।
काढूं तणसर पिकामधें पटापटा ।
पिकं भरोनी रान डोलूंद्या । मोद भारी नजरेला ।।४।।

करूं कापणी जलदीनं । चल गोंद्या ।
तिवडचा भंवती पात हाकूं । चल म्हाद्या ।
मोत्यांची ती रास पडूंद्या । देवाच्या किरपेला ।।५।।

---

— ० भरपूर स्टॉक — योग्य दर ० —
शाळा, ट्रे. कॉलेज, इंजिनिअरिंग, आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेजची
पुस्तकें आणि ड्रॉइंग-मटेरियल व इंजिनिअरिंग-मटेरियल
— मिळणेचे ठिकाण —
## — रत्नाकर बुक डेपो —
ताराबाई रोड, कोल्हापूर-२. (फोन नं. ७३५)

# जाऊं दर्याला

(चाल- सर जो तेरा चकराये दिल डूबा जाये)

शुक्रीर चांद आला । वरती उगवतीला ।
वल्हीं जाळी । टाकुन खांद्या । जाऊं दर्याला । मासं धरण्याला ।।धृ।।

झुळझुळतो । सळसळतो झांवळामधीं भिरभिरतो ।
पहांट वारा । सोंगडी खरा । होडी हांकारायाऽला ।।जाऊं दर्याला।।१।।

किलबिलती । फडफडती । आकाशामधीं । बागडती ।
आपुल्यासंगे पक्षी निघाले । भक्ष्यं शोधायाला ।। जाऊं दर्याला ।।२।।

चढा चढा । वरती चढा । फडा फडा । शिड सोडा ।
वल्ही हाती । घेऊन जल्दी । मारूं मतलई वाऽरा ।। जाऊं दर्याला ।।३।।

डोंगरावरी । लाटांचा झोपाळा हा । दर्याचा ।
होडी नाचे । खंबीर मनचे । घेऊंया झोक्याला ।। जाऊं दर्याला ।।४।।

जाळें घ्या । तयार व्हा । नेट धरुनी । उभे रहा ।
जोरानें मग । जाळें फेका । एक मुखानें । हुऽऽय्या ।।
ओढूं जाळ्यालाऽ । मासं काढण्याला ।।५।।

गच्च भरे । आतां पुरे । परतुं आतां । घराकडे ।
वल्हवूं होडी । जल्दी आतां । भरती आनंदाऽला ।।
जाऊं दर्याला ।।६।।

---

सदर 'गीत' वाचतांच अभिनय कळण्यासारखा आहे. म्हणून टीप दिलेली नाही.

---

'दातांचा दवाखाना' डॉ. कै. डी. कुलकर्णी
महाद्वार रोड, कोल्हापूर.

# दर्यावर स्वारी

( चाल– मन शुद्ध तुझं )

वल्हव वल्हव वल्हव वल्हव होडी साजणा ।
दर्यावर चल आतां स्वारी करुंया ।। धृ० ।।

घुंई घुंई घुंई घुमतो हा वात भूवरीं ।
गड गड गड वाजती ढग वरतीं अंबरीं ।
बिजलीच्या चमकीनं दूर जाऊया । दर्यावर... ।।१।।

उसळती या लाटा बघ डोंगरापरी ।
थुई थुई थुई नाच करी होडी त्यावरी ।
राजापरी बसून जाऊं दूर देशाला । दर्यावर... ।।२।।

सळसळती मासं बघू निळ्यासागरी ।
क्षणामंधीं जळी लपती मारुनी बुडी ।
मासं धरण्या मोठ मोठ, जाळं फेकुया । दर्यावर... ।।३।।

ओढा ओढा जाळीं आतां जोर करुनिया ।
दर्याची दौलत ही भरुन नेऊया ।
चढून वरतीं शीडं काढू परतुं घराला । दर्यावर... ।।४।।

शांत होई निळा निळा समिंदर राजा ।
दिन ढळला, खग उडतो, धाई घराला ।
वल्हीं जल्दी मारूं आतां जाऊं तिराला । दर्यावर... ।।५।।


---

अभिनय सोपा व पूर्वी आलेला आहे. मात्र पाश्चिशन्स चांगल्या घ्याव्यात.

---

घड्याळे दुरुस्तीचे–विश्वासाचे ठिकाण व
स्वस्तिक रबर सीलस् मिळणेंचे केंद्र —

**आर. के. आणि कंपनी,**
हरभट रोड, सांगली



# भलंरी दादा

भलंरं दादा । भलं गड्डी दादा ।
शेतांत आता जाऊंयार ।
बिगी[२] बिगी चला ।। धृ ।।

वरुण[३] राजानं केली किरपा । करा पेरणी[४] अता झपूझपा ।
तणसर[५] काढूं वाढूं द्या पिका ।
डोले पीक[६] रं वाऱ्यानं । काम करा ।। भलंरं ।।१।।

विहिरीवरती[७] मोट धरुनी । सरजा राजाला गाणं गाऊनीं ।
मोट घेऊंद्या भरुन पाणी ।
शेतास पाणी पाजुंयारं । काम करा ।। भलंरं ।।२।।

पीक[९] वाढलं कणसं आली । माळ्यावरती[१०] बसूं चढोनी ।
उडवूं[११] पांखरं गोफण मारुनी ।
करुं कापणी नेटानं । आता भरा भरा ।। भलंरं ।।३।।

करुंया मळणी [१३] पात जपूंया । वार देऊन[१४] धान्य भरुंया ।
भरभर[१५] गाड्या घरीं नेऊया ।
धान्य लक्ष्मी घरी आली पुजूं चला ।। भलंरं ।।४।।

---

१) तालात उड्या मारत हातानें 'भलं' असा अभिनय करणें. २) त्याच तालात गोलावर चालणें. ३) हात वरुन खाली आणणें व पाऊस पडल्याचे दाखविणें. ४) वाकून ठेक्यांत पावले टाकत पेरणी करणें ५) बसून भांगलण्याचा अभिनय. ६) उठून हात वर करुन डोलणें. ७) मोटेच्या दोरावर बसून मागें पुढें जाणें. ८) वाकून शेतास पाणी पाजविणें. ९) बसून उठणें व डोक्यावर कणसाप्रमाणें हात धरणें. १०) माळयावर चढणें. ११) गोफण फिरवून मारणें. १२) बसून कापणी करणें. १३) बैला प्रमाणें, डोक्यावर हातांची शिंगे धरुन वाकून चालणें. १४) हात वर तिरके धरुन 'वारं देणें'. १५) गाड्या भराभरा हाकणें.

# दिवाळी

आली दिवाळी वर्षाची । झाली सुट्टी[१] शाळेशी ।
या इकडे । सर्व मुले । मौज आपुल्या जीवाची ।। धृ० ।।

खणा खणा[२] । माती खणा । पाणी ओढूं झणी चला ।
ओतून पाणी । चिखला तुडवूं । करूं तयारी किल्ल्याची ।।१।।

चिखल भरोनी । पाट्या उचला[३] । जागेवरती । घेऊनी चला ।
रायगडापरि बांधूं किल्ला । करूं स्थापना शिवबाची ।।२।।

फडकावूंया । झेंडा[४] भगवा । शूर मावळे । लवकर या या ।
करूं पहारा । किल्ल्याभवती । भीति न आपणा शत्रूची ।।३।।

प्रणाम करूया[५] । ह्या झेंड्याला । तसाच मुजरा श्री शिवबाला ।
तलवारीचे । पाणी पाजुन । जिरवूं मस्ती शत्रूची ।।४।।

चला चला रे । गोळ करा । मांडी[६] घालुन । पुढे सरा ।
फराळावरीं ताव मारुया । क्षिती न आपणा पोटाची ।।५।।

---

१) आनंदाने टाळ्या वाजवित तालावर चालणें, २) माती खणणें, पाणी ओढणें, चिखल तुडविणे, ३) डोक्यावर पाटी घेऊन चालणें, किल्ल्याला माती थापणें, ४) झेंडा एका हातात पावित्र्यात धरणें, पहारा करणें, ५) प्रणाम व मुजरा करून तलवारीची लढाई, ६) मांडी घालून निम्मी बैठक व फराळ खाणेंची कृती.

---

उत्कृष्ट फोटोसाठीं ---

**A1 फोटो स्टुडिओ** म्हणजेच **नानासाहेब पाटील**

राजाराम रोड, कोल्हापूर

## — फळवाला —

( चाल : बागड बं बं बं बाजे डमरू )

ठण् ठण् ठण् ठण् ठण् जाहली घंटा ।
गाडि फळांची आली अता खाण्या नच तोटा ।। धृ० ।।

मोठीं मोठी रसाळ संत्रीं खाण्या भारी गोड ।
नागपूरहून आणली आम्हीं पहा चाखुनि फोड ।
अंग मध्ये येत तरतरी रसास नच तोटा ।। गाडि फळांची ।।१।।

वसईची ही मोठीं केळी घ्या हो खाण्याला ।
गोड गोड अन् खाण्या अच्छे पोट भरण्याला ।
अच्छी अच्छीं देतो बाई माल नसे खोटा ।। गाडि फळांची ।।५।।

खंडाळ्याच्या घाटातली ही करवंदे काळी ।
वरून दिसली काळी तरी ती आंत असे लालीं ।
आटपा लौकर करवंदाचा माल असे थोडा ।। गाडि फळांची ।।३।।

चिक्कूपणा तो सोडा आता चिक्कू खाण्याला ।
ठाण्याचा हा माल अस्सल आणला विकण्याला ।
माल चाखुनि पर्स उघडा दाम नको खोटा ।। गाडि फळांची ।।४।।

पुण्याहून ही आज आणली ताजी मोसंबी ।
निघाली आंबट तर द्या मजला तुम्ही हो तंबी ।
सोला साली फोडो चाखा माल असे मीठा ।। गाडि फळाचीं ।।५।।

२१८८८

एन्. बी. इ. आर. टी. — ३ री

# जय बजरंग

जय बजरंग । जय बलभीम ।
जय हनुमान जय बोलो ।
शरीर माद्यं सर्व साधनम् मनात आपुल्या मंत्र धरू ।
सशक्त होऊन आपण आपुल्या देशाचा उद्धार करूं ।। धृ. ।।

प्रभात समयी नित्य उठूं ।
दात नी मुख हे साफ करूं ।
देह कर्म नेमे आचरूं ।
स्वच्छ जलानीं स्नान करूं ।
निर्मल देहे, दुग्ध प्राशुनी, रवि राजाला नमन करूं ।। सशक्त ।।१।।

फुगा फुप्फुसे वायुचा ।
प्राणवायु तो जरुरीचा ।
हृदय खजिना रक्ताचा ।
ठोका नियमन नाडीचा ।
घोड दौड ही, मैदानावरी सानंदाने नित्य करुन ।। सशक्त ।। २ ।।

---

पुण्यापासून बेळगांवपर्यंत आणि रत्नागिरीपासून सोलापूरपर्यंत
स्पोर्टस्च्या अद्यावत साहित्याचे व मुलांच्या खेळण्यांचे
— एक अग्रेसर दुकान —
रॅमसन् ब्रदर्स
शिवाजी रोड, कोल्हापूर.

एन्. सी. इ. आर. टी. -- इयत्ता ४ थी

# पृथ्वी

या विश्वामधे सूर्यमाला मनामधे ठसली ।
आठ भावामधें पृथ्वी बहीण त्यांची सजली ।।धृ०।।
बुध, शुक्र, मंगळ । गुरु, शनी शोभल ।
युरेनस नेपच्यून भलं । प्लुटो सर्वात दूर ।
तीन नंबरास पृथ्वी बसली ।। १ ।। आठ भावा...
वरून दिसते शांत । पोटी रस तप्त ।।
जेव्हा खळबळत । धरती थरथरत ।
भूकंपानं जनता गांजली ।। २ ।। आठ भावा...
जाड जमीन इथं । हलकी जमीन तिथं ।
भेगा पडून कुठं । तप्तरस येत ।
ज्वालामुखीनं हाकाटी केली ।। ३ ।। आठ भावा...
भाऊ बहिणींपरी । पृथ्वी चंद्र जोडी ।
ओढ अंतरीची । एकमेका ओढी ।
प्रेमे सागरा भरतीं आली ।। ४ ।। आठ भावा...
सूर्य, पृथ्वीं चंद्र । एका रेषेत येत ।
होतं चंद्रग्रहण । तेव्हा पृथ्वीअरतं ।
पौर्णिमेस संधी ही आली ।। ५ ।। आठ भावा...
सूर्य पृथ्वी मध्ये । चंद्र जेव्हा वरे ।
अमावस्येस होतं । सूर्य ग्रहण खरे ।
एक रेषा तिघांची जमली ।। ६ ।। आठ भावा...

---

० साहित्य ० ज्ञान ० मनोरंजन या साठीं --
**पुष्पगंध मासिक,** द्वारा, श्री शक्ति प्रकाशन, कोल्हापूर
सर्व प्रकारची छपाई, बुक बायडिंग व रबरी शिक्के यासाठी ---
**शक्ति प्रिंटर्स,** ३२३८ अ, बाबू जमाल रस्ता कोल्हापूर-२.

एन्. सी. इ. आर. टी. -- ४ थी

# ' आराम है हराम '

' काम करा रे ' उठा जवानो । आळसा द्याहो विराम ।
आराम है हराम ।। धृ ।।

प्रचंड शीला उचला हाते ।
अपुरी आपुली शक्ती पडते ।
' तरफेने परी जग ही उचलूं ' सत्यच हे विज्ञान ।। आराम है हराम ।।

प्रचंड शक्ती आगगाडीची ।
सागरावरी आगबोटींची ।
ऊर्जा साधे वाफेने ही । मानव बुद्धी महान ।। आराम है हराम ।।

जग हे उजळे ज्या तेजाने ।
काम सुलभ हे यंत्र युगाने ।
विद्युत आली आपुल्या हाते । झालो आम्ही सज्ञान ।।आराम है हराम।।

मानव शरीरी ऊर्जा असते ।
विद्युत चुंबक, वाफ साधते ।
मानव होई प्रबळ जगी हा । साह्य करी विज्ञान ।। आराम है हराम ।।

---



शालेय क्रमिक पुस्तकें, धार्मिक व ज्योतिष-विषयक पुस्तकें, नाटकें,

शिवण, चित्रकला, रांगोळी इ० पुस्तकें

मिळणेचे ठिकाण :

**कोल्हापूर स्टेशनर्स अँड बुक-सेलर्स,**

महाद्वार रोड, कोल्हापूर

## सजीव सृष्टी

बाळ भात खातं । पाणी पितं । श्वास घेतं ।
पिल्लू दाणा खातं । पाणी पितं । श्वास घेतं ।
वासरू गवत खातं । पाणी पितं । श्वास घेतं ।
रोप माती खातं । पाणी पितं । श्वास घेतं ।
कारण त्यांना भूक तहान लागते ।
आणि त्यांना जीव आहे ।१।

बाळ रडतं । पिल्लू चिवचिवतं ।
वासरू हंबरतं । रोप सुखावतं ।
कारण त्यांना जीव आहे ।२।

बाळ मोठं होतं । त्याचा माणूस होतो ।
पिल्लू मोठं होतं । त्याची चिमणी होते ।
वासरू मोठं होतं । त्याची गाय होते ।
रोप मोठं होतं । त्याचा वृक्ष होतो ।
कारण त्यांना जीव आहे ।३।

आईला बाळ होतं । चिमणीला पिल्लू होतं ।
गाईला वासरू होतं । 'बी' पासून रोप होतं ।
कारण त्यांना जीव आहे ।४।


---

सदरील बडबड-गीत सजीव सृष्टी व निर्जिव सृष्टी असे मुलांचे दोन गट करून प्रत्येक गटाने एकेक कडवे करून म्हणावे.

## निर्जीव सृष्टी

टेबल काही खात नाही । पीत नाही ।
श्वासही घेत नाही ।
खुर्ची काही खात नाही ।
पीत नाही । श्वासही घेत नाही ।
पाटी काही खात नाही ।
पीत नाही । श्वासही घेत नाही ।
पुस्तक काही खात नाही ।
पीत नाही । श्वासही घेत नाही ।
कारण त्यांना तहान भूक लागत नाही
आणि त्यांना जीव नाही ।१।
टेबल काही रडत नाही ।
खुर्ची काही रडत नाही ।
पाटी काही रडत नाही ।
पुस्तक काही रडत नाही ।
कारण त्यांना जीवच नाही ।२।
टेबल मोठं होत नाही ।
खुर्ची मोठी होत नाही ।
पाटी मोठी होत नाही ।
पुस्तक मोठं होत नाही ।
कारण त्यांना जीवच नाही ।३।
टेबलाला बाळ होत नाही ।
खुर्चीला बाळ होत नाही ।
पाटीला बाळ होत नाही ।
पुस्तकाला बाळ होत नाही ।
कारण त्यांना जीवच नाही ।४।

एन्. सी. इ. आर. टी. -- ३ री



# पृथ्वीची भाऊबीज

भाऊबीजेचा दिन हा सजला ।
पृथ्वी गहिवरली । चंद्रूची भेट नाहीं झाली ।।

म्हणती बाळें 'आई जाऊ मामाच्या गावी' ।
दूरदूर तो मामा फिरतो का धरणीं माई ।
'जग नियंत्याचे बंधन त्याला' बाळांनो ठाई ।। चंद्रूची भेट ।।१।।

हाक मारतो चंदामामा तुम्हा भाच्यांना ।
कैसे जाता येईल त्याच्या दूरदूर गावा ।
विज्ञानाची करुनी गाडी जाऊ भेटण्याशी ।।
मोद बहु होई धरतीशी ।। २ ।।

सजली बाळें केली गाडी दूरदूर जाया ।
शुभदिन आला गाडी सुटली ठरल्या समयाला ।
विद्युत वेगे धाऊ लागले यान अंतराळी ।। मोद बहु. ।। ३ ।।

बहु हर्षला चंदामामा पाहुन यानाला ।
फिरु लागले यान भोवती मामाच्या गावा ।
हळू टेकले यान वरती हो चंद्रभूमिवरती ।। मोद बहु. . ।। ४ ।।

दार उघडले नव यानाचे नव विज्ञानाचे ।
प्रथम उतरला आर्मस्ट्रॉंग हा गृह हे मामाचे ।
ठसा उमटला चंद्रभूमिवर भरते प्रेमासी ।। मोद बहु. ।। ५ ।।


नाचू लागले गाऊ लागले चंद्र संगतीला ।
विज्ञानाने जिंकू लागला मानव विश्वाला ।
भाऊबीजेस्तव रत्नें आणली धरणो भगिनीशी ।। मोद बहु होई ।। ६ ।।



एन्. सी. इ.
आर. टी. – ३ री

# हवा

(–– चाल ––)
( कव्वालीची )



इकडं हवा ही । तिकडं हवा ही ।
चहुकडं भरली हवा हवा ।।धृ०।।
ऑरेंज हवे का लेमन घेता ? ।
नळीतूनी ती हवाच शोषा ।
ऑरेंज तोंडी मधुर भरे हा । याला कारण दाब हवा ।।१।।
डॉक्टर आता आपण होऊं ।
पिचकारी इंजक्शनची घेऊं ।
दट्ट्या ओढतां भरते नलिका । याला कारण दाब हवा ।।२।।
पाण्यासाठी होत हाकाटी ।
दुष्काळात जव मेटाकुटी ।
बोरींगचा पण उडतो फवारा । याला कारण दाब हवा ।।३।।
बाळाचा तो फुगा फुगवता ।
चेंडू हवेविण कसा खेळता ।
सायकल मोटर सुरळित चाले । याला कारण दाब हवा ।।४।।
प्राणवायुविण जग ना चाले ।
जगण्या जळण्या जरूरी बरे ।
कार्बनडॉयाक्साईड वनस्पती शोषे । शुद्ध होई ही हवा हवा ।।५।।

---

श्री. हेरलेकर यांच्याकडून ––––

## — गीतांचे प्रात्यक्षिक जरूर पहा —

भेटा अगर लिहा –– श्री. बा. उ. हेरलेकर, द्वारा : 'पंचवटी',
संयुक्त महाराष्ट्र हाऊसिंग सोसायटी, प्लॉ. नं. ४५,
राजारामपुरी पूर्व, कोल्हापूर.

एन्. सी. इ. आर. टी. -- ९ वी

# आपली पृथ्वी गोल आहे

परमेशाने बुद्धि दिधली शक्ति मानवाला ।
विज्ञानाने दुबळा मानव प्रबल जगीं झाला ।।

पृथ्वी आपुली चंद्रावरुनी, दिसते गोल अहा ।
भाग्यवान त्या 'आर्मस्ट्रॉंग'ने सत्य पाहिली पहा ।।

प्रयोग करुनी आपण पाहू खरेच का हो ते ।
पृथ्वी सावली चंद्रग्रहणी, गोल खरी दिसते ।।

एक दिशेने आपण जाऊ पृथ्वी प्रदिक्षाया ।
आपण येऊं काही दिसानी आपुल्या जागेला ।।

दूरानंतर शीड, खालचे जहाज ये दिसते ।
जाताना परि अदृश्य खालुन, प्रथम तेच होते ।।

फेका दृष्टी पृथ्वीवरती नजर कुठे पुरते ।
वरवर जाऊं तशीच पृथ्वी जास्त जास्त दिसते ।।

सम उंचीच्या उभारु काठया, तीन समुद्रात ।
मधली काठी उंचच दिसते, समा अंतरांत ।।

असे कसे हे सर्वच दिसते ? कारण सांगा ते ।
प्रयोग पाहुन आम्हीं सांगू 'पृथ्वी गोल ते' ।।

उत्तम स्टील फर्निचर व स्टील सेफसाठी भेटा

— विजय सेफ कंपनी —

शेळके पूल, कोल्हापूर

## समूह गीत

( चाल– भारत देश महान्. . . )

वाद्यें झडती, घोष भारती । गर्जा जय जय कार ।
'मानवते'चा दिव्य शांतिचा । गगनी जय जय कार ॥ध्रु.॥
इथे जन्मले राम कृष्ण ते । श्री शुक, वाल्मिकी, व्यास ऋषि ते ।
बुद्ध, अशोक नि जगत् गुरु ते ।
पद युगलांनी पवित्र देशी । गर्जा जय जय कार ॥१॥
त्यागाचा हा मंत्र महान् । रामदास गुरु देति शिकवून ।
श्री शिवबा तो भारत भूषण ।
त्यांच्या देशीं त्यागाचा तो । गर्जा जय जय कार ॥२॥
आपण सारे भाऊ होऊनि । हृदयाला ते हृदय जोडुनि ।
अेक मुखाने विश्वा सांगुनि ।
मानवता हा, धर्म आचरा । गर्जा जय जय कार ॥३॥

REFBK-0021888
REFBK-0021888

## ...ग फुंकले आता

( बाटचाल गीत )

...तां । सज्ज व्हा उठा चला ।
मावळचे वीर आम्ही । जाऊं देश रक्षणा ॥ध्रु.॥
१।२ उचलूं पाय । चूक आता व्हायची नाय ।
शिस्तिमध्ये चालुनि । जाऊं देश रक्षणा ॥१॥
खांद्यावरी बंदुकी घ्या । शत्रूवरी नेम धरा ।
दबुन दबुन राहुनि । गोळी सूं सूं झाडूया ॥२॥
आराम हराम हा । कसा आता कंबरा ।
हातीं ध्वजा उंच धरा । प्राणपणें रक्षुंया ॥३॥
पाठीवरी घ्या बोजा । हिमालयावरतीं चढा ।
डागूं तोफ धडाधडा । शत्रूला चारू खडा ॥४॥
घरघरे विमान वरी । गगनीं पांखरा परी ।
टाकूं बाँब शत्रुवरीं । त्यास करूं घाबरा ॥५॥

## — राष्ट्र-ध्वज गीत —

( चाल – मंगल देशा पवित्र देशा )

फडक फडक तूं तिरंगी झेंडया नभांत डोलत ।
स्वातंत्र्याच्या शुभदिनीं फडके, नभीं मंडपांत ।।

' गौरी शंकर ' भूषविलें तूं, जगीं उच्च स्थान ।
मानवतेचा मंत्र सांगशी, विश्वा हर्षानें ।।

धवल हिमापरी , हृदय धवलही भारतियांचे तें ।
अधिष्ठित तूं, या भूमिवरी मान चिन्ह आमुचें ।।

रंग केशरी, त्याग दावितो, तसें बलिदान ।
' देशास्तव व्हा संन्यासी अन् अर्पा स्वप्राण ' ।।

रंग पांढरा शुध्द भाव तो, तुझ्या हृदीं गमतो ।
हिरवा दावी 'दिव्य शांतिमय' मार्ग मनीं ठसतो ।।

संघटनेंचें, लोकशाहिचें प्रतीक तें चक्र ।
देशासाठीं एक होऊनि विसरुं जात पात ।।

फडक ध्वजा तूं, डौलाने अन् स्वाभिमानानें ।
रक्षुं तुला रे 'हीच प्रतिज्ञा' अमुच्या बलिदानें ।।

---

## –= शेकोटी प्रार्थना =–

या बंधुनो जवळी या, ह्या शांत वेळीं ।
ठेवोनि इंधन झणीं करूं येथ होळी ।।

गोलावरी त्वरित येउनि हात सांधूं ।
अग्नीसमोर बसुनी, प्रभू त्यास वंदूं ।।

ज्वाला तुझ्या प्रसरति हे अग्निदेवा ।
मत्शक्ति ही प्रसरूंदे या देश काजा ।।

अग्नीत होवो वैराग्नि होळी ।
वाढोत प्रेम, सहकार्य, या बंधु जवळी ।।

घेऊन ही ऊब देशार्थ देऊं ।
घेऊं इथे शपथ ही हृदयांत ठेऊं ।।

।। ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।